## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव –** वसंत पुडलिक पाटील.

**वय** - ४९ वर्ष, **व्यवसाय** - शेती व गाडीचालक,

**राहणार.-** कडगाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

## सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील.

**१.** मी अपघातातील जखमी व मयताला ओळखतो. मी दि.०६.०८.२०१९ रोजी माझी मोटारसायकल क्र. एम.एच.–०९–३८४५ ने एकटा बेळगुंदीकडे जात होतो. त्यावेळी माझ्या पाठीमागे पांडुरंग इंजल व निशांत केसरकर त्यांच्या पॅशन मोटारसायकल वरती येत होते. आम्ही सर्व निशांत केसरकरच्या बेळगुंदी येथील घरी पुराचे पाणी आल्यामुळे साहित्य काढण्यासाठी चाललो होतो.

**२**. निशांत व पांडुरंग येत असलेली गाडी पांडुरंग चालवित होता व निशांत पाठीमागे बसलेला होता. आम्ही सर्व उत्तूर वरुन आर्दाळ मार्गे बेळगुंदी गावी चाललो होतो. आम्ही दुपारी ०१.०० ते ०२.०० वाजेच्या दरम्यान उत्तूरच्या पुढे आर्दाळ गावाजवळील गुरव यांच्या शेतापाशी असलेल्या ओढयाजवळ आलो असता, समोरुन आलेल्या ब्रिझा गाडी क्र. एम.एच.–०९–०८४५ ने येऊन माझ्या मोटारसायकलला धडक दिली होती. त्या गाडीने पुढे माझ्या पाठीमागून येत असलेल्या पांडुरंग व निशांत बसलेल्या गाडीला धडक दिली होती.

**३**. त्या अपघातात मी गाडी घेऊन रस्त्याच्या बाजूला पडलो होतो. त्यानंतर मी उठून पाहिले असता, पाठीमागून येत असलेला निशांत रस्त्याच्या कडेला पडलेला होता. त्याच्या पायाला व डोक्याला दुखापत झाली होती. त्यानंतर तेथे १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका आली होती. त्यामधून आम्हा सर्वांना गडहिंग्लजला दवाखान्यात नेण्यात आले होते. तेथे निशांतला जास्त मार लागल्यामुळे तो मयत झाल्याचे आम्हाला सांगितले होते.

**४**. आम्हाला धडक दिल्यानंतर ब्रिझा गाडी समोर जाऊन थांबली होती. त्यामध्ये चार ते पाच लोक होते. ती गाडी चालविणारा चालक दारुच्या नशेत असल्याचे वाटत

होते. मी घटने नंतर त्याला पाहिले होते. तो आज न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने त्याच्याकडे बोट दाखवून त्याला ओळखले आहे. मला त्याचे नाव रोहित मुळीक असल्याचे समजले होते. आमचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झालेला आहे. पोलिसांनी माझा दवाखान्यात असताना जबाब घेतला होता.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.</u>**

**५.** जखमी पांडुरंग इंजल माझा मित्र आहे. आम्ही बेळगुंदीला जात असलेल्या दिवशी पावसामुळे सर्व नदया–नाले भरलेले होते. आम्ही ०१.३० वाजेच्या आसपास कडगाव येथून निघालो होतो. घटनेच्या दिवशी निशांत हा पांडुरंग इंजल यांच्या घरी होता. माझी पांडुरंग इंजलच्या नातेवाईकांशी ओळख नाही. निशांत हा त्याचा दाजी पांडुरंग याच्या घरी येत असल्यामुळे आमची ओळख झाली होती.

**६.** घटनेच्या आदल्या दिवशी निशांत कडगाव येथे आला होता. आम्ही कडगाव पासून एकामागे एक निघालो होतो. आम्ही जात असताना थोडाफार पाऊस पडत होता. आम्ही सर्वांनी रेनकोट घातलेला होता. आम्ही उत्तूर येथे निशांतच्या नातेवाईकांच्या मेडिकलमध्ये ५ मिनिटे थांबलो होतो. उत्तूर पासून घटनास्थळा पर्यंतचे अंतर साधारणपणे ५ ते ६ कि.मी. आहे.

**७.** घटनास्थळापाशी उत्तर दिशेला उताराचा रस्ता असून पुढील बाजूस वळण आहे. घटनेच्या दिवशी तुरळक वाहने ये–जा करत होती. मला समोरुन आलेल्या ब्रिझा गाडीचा टायर फुटल्याची माहिती नाही. माझ्या पायाला मार लागून गाडीच्या सायलेंसरला धक्का लागल्यानंतर मी पडलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, उत्तूर पासून पुढे घटनेच्या वेळी निशांत गाडी चालवत होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही उत्तूर पासून १०० ते १५० फूटाचे अंतर राखून जात होतो.

**८.** निशांत हा त्याच्या आई–वडिलांचा एकूलता एक मुलगा होता. हे म्हणणे खरे नाही की, निशांत व्यसनी होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी निशांत वेगात गाडी चालवत होता. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेच्या वेळी पाऊस असल्यामुळे ब्रिझा गाडी कोण चालवत होते ते लक्षात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला

धडक लागल्यानंतर ब्रिझा गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारात गेली होती. मी ब्रिझा गाडीचा टायर फुटल्याबाबत चौकशी केली नव्हती.

९. मी अपघातानंतर सुरुवातीचे ५ मिनिटे बेशुध्द होतो, त्या दरम्यान मला काय घडत होते याची जाणीव नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटने नंतर गाडीतील लोकांना पाहिले नव्हते. मी रुग्णवाहिकेतून जात असताना आम्हाला धडक देणारी ब्रिझा गाडी पाहिली होती. मला व पांडुरंगला घटनेच्या दिवशीच दवाखान्यातून प्राथमिक उपचार करुन सोडण्यात आले होते.

**१०**. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात मयत निशांतच्या चुकीमुळे झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पांडुरंग माझा मित्र असल्यामुळे त्याला मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

दिनांक – २०.१२.२०२४.
आजरा.

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४.</u>**

**<u>मी शपथेवर कथन करते की,</u>**

**नाव –** मनिषा दत्तात्रय गुरव.

**वय** - ४३ वर्ष, **व्यवसाय** - आर्दाळ पोलिस पाटील,

**राहणार.-** आर्दाळ, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील.</u>**

**१.** मी सन २०१२ पासून आर्दाळ गावची पोलिस पाटील म्हणून काम पाहत आहे. मी चार वर्षांपूर्वी ऑगस्ट महिन्यात ६ तारखेला जास्त पाऊस झाल्यामुळे ओढयाचे पाणी बघण्यासाठी गल्लीतील शेजारी निर्मला जाधव व उज्वला शेळके सोबत शेताकडे गेले होते. आम्ही दुपारी ०२.०० च्या दरम्यान आर्दाळ गावातील कमानीजवळ गेलो असता, आम्हाला जोराचा आवाज आला होता.

**२.** त्यामुळे आम्ही आवाज आलेल्या दिशेने ओढयाकडे गेलो होतो. त्यावेळी तेथे एक मुलगा पडलेला होता. त्याला चार ते पाच लोक उचलण्याचा प्रयत्न करत होते. त्यानंतर तेथे लोक जमले होते, तेथे रस्त्याच्या बाजूला एक लाल रंगाची ब्रिझा गाडी उभी होती. त्यावेळी तेथे जमलेले लोक ब्रिझा गाडीतील मुले पळून गेल्याचे सांगत होते. त्यानंतर तेथे आलेल्या रुग्णवाहिकेतून दोन ते तीन लोकांना दवाखान्यात नेले होते. तेथे दोन मोटारसायकली होत्या. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता. मी अपघात होताना पाहिला नव्हता. मला जखमी मुलाचे नाव निशांत असल्याचे लोकांकडून समजले होते.
**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.</u>**

**३.** पोलिसांनी माझा जबाब विचारपूस केल्यानंतर तयार केलेला आहे. आमच्या गावाच्या कमानी पासून घटनास्थळ एक ते दोन मिनिटांच्या अंतरावरती आहे. आम्ही पाहणी करायला जात असताना भरपूर पाऊस पडत होता. आम्ही जाताना अपघात पाहिल्यानंतर पुढे शेताकडे गेलो नव्हतो.

**४.** मला घटनास्थळी गेल्यानंतर ब्रिझा गाडी कोण चालवत होते तसेच त्या गाडीत कोण–कोण बसलेले होते ते दिसले नव्हते. मी घटनास्थळी गेले तेव्हा, ब्रिझा गाडीमध्ये

कोणीही नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात संपुर्ण ऐकीव माहिती सांगितली आहे. मी ब्रिझा गाडीजवळ गेले नव्हते. मी घटनास्थळी रुग्णवाहिका येईपर्यंत थांबले होते. घटनेमध्ये जखमी झालेल्या दोन व्यक्ती बोलत होत्या. घटने नंतर १५ ते २० लोक जमले होते, मला त्यांची नावे सांगता येणार नाही. मला सदर अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला याबाबत सांगता येणार नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २०.१२.२०२४. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** पांडुरंग कोंडिबा केसरकर.

**वय** - ५२ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार.-** भादवण, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील.**

**१.** मी आरोपी माझ्या गावात राहत असल्यामुळे ओळखतो. मी सन २०१७ साली व्हीटारा ब्रिझा गाडी क्र. एम.एच–०९–डी–ई.जे.–०८४५ घेतली होती. मी ती गाडी दि. ०४.०६.२०१९ पर्यंत वापरली होती. मी त्यानंतर माझी गाडी नोटरी कराराने आरोपीला दि. ०४.०६.२०१९ रोजी विकली होती. मी त्याच दिवशी गाडी आरोपीच्या ताब्यात दिली होती. त्यानंतर तो तिचा वापर करत होता.

**२.** मला ऑगस्ट महिन्यामध्ये आरोपीने दोन मोटारसायकल चालकांना धडक दिल्यामुळे त्यातील निशांत केसरकर हा गंभीर असल्याचे समजले होते. मला पुढे तो मयत झाल्याचे कळाले होते. पोलिसांनी तपासा दरम्यान माझ्याकडून गाडीची कागदपत्रे घेतली होती. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. मी गाडी विकलेला आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**३.** मी आरोपीला विकलेली गाडी नवी खरेदी केली होती. मी दोन वर्षे गाडी वापरली होती. मी आरोपीला गाडी विकताना तिचे टायर बदलले नव्हते. माझा बांधकाम क्षेत्राशी निगडीत व्यवसाय आहे. माझी गाडी भरपूर फिरली होती. मी आरोपीला गाडी देताना तिचे टायर घासलेले होते.

**४.** मला गाडीचा टायर फुटून अपघात झाल्याचे समजले होते. मी गाडी विकली तेव्हा आरोपी कॉलेजचे शिक्षण घेत होता. आरोपी कोणतेही व्यसन नसून तो चांगला मुलगा आहे. मी गाडी विकण्यापूर्वी मला त्याच्या विरोधात तक्रारी ऐकायला मिळाल्या नव्हत्या.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २०.१२.२०२४.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.